महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे Rs.2/- कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ ५ मे २०२५ ■ वर्ष ६ ■ अंक ३०६ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राज्यात १२५ वसतिगृहे उभारणार

## - सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांची माहिती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर:** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून राज्यात १२५ वसतिगृहे उभारण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिली. या वस्तीगृहांमुळे गोरगरिब विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण उपलब्ध होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आगमन दिन महोत्सवानिमित्त बदलापुरात आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी ही माहिती दिली. वसतिगृहे उभारण्याच्या कामासाठी १५०० कोटी रुपयांचा निधी मजूर करण्यात आला असून त्यातून राज्याच्या सर्व तालुक्यात वसतिगृहे उभारणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर राज्यातील वसतिगृहाची संजय शिरसाट यांनी पाहणी केली होती. त्यानंतर विद्यार्थ्यांना चांगल्या सोयीसुविधा व उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी हा निर्णय घेतल्याचे शिरसाट म्हणाले. भीमा कोरेगाव येथे विजय स्तंभाला मानवंदना देण्याच्या एक दिवसाच्या कार्यक्रमासाठी राज्याच्या सामाजिक न्याय विभागाकडून दरवर्षी साडे चौदा कोटी रुपये खर्च केले जातात. मात्र इतर दिवशी तिथे कोणत्याही सोयीसुविधा नसतात. त्यामुळे भीमा कोरेगाव विजय स्तंभ परिसराचा विकास करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून आता हे काम सुरू होणार असल्याचे संजय शिरसाट यांनी सांगितले. दुरून दुरून लोक भीमा कोरेगाव पाहण्यासाठी येतील अशा पद्धतीने या परिसराचा विकास केला जाणार असल्याचे संजय शिरसाट म्हणाले.

बदलापूरचे शिवसेना शहरप्रमुख वामन म्हात्रे यांनी बदलापुरातील सोनिवली येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे काम पूर्ण झालेले नसल्याची बाब निदर्शनास आणून दिली. यावर या स्मारकासाठी २० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देऊन कल्याणच्या धर्तीवर स्मारकाचा विकास करण्याचे मंत्र्यांनी आश्वासन दिले.

यावेळी बहुजन युवा नेतृत्व प्रवीण राऊत, माजी नगरसेवक अविनाश मोरे, सोनिया ढमढेरे आदींसह कार्यक्रमाचे आयोजक दिलीप पवार, महेंद्र नवगिरे व त्यांचे सहकारी उपस्थित होते.



# आज बारावीच्या परिक्षेचा निकाल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता बारावीच्या परिक्षेचा निकाल उद्या म्हणजेच सोमवारी जाहीर होणार आहे. ठाणे जिल्ह्यातून १ लाख २१ हजार २४४ विद्यार्थ्यांनी बारावीची परिक्षा दिली होती. १९७ परिक्षा केंद्रावर ही परिक्षा पार पडली होती. ही परिक्षा कॉपीमुक्त व्हावी यासाठी जिल्हास्तरावर चार भरारी पथक तैनात करण्यात आले होते. आता, उद्या जिल्ह्यातील किती विद्यार्थी या परिक्षेत उत्तीर्ण होतायत याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### कुठे पाहाल ऑनलाईन निकाल ?

१) https://results.digilocker.gov.in
२) https://mahahsscboard.in
३) http://hscresult.mkcl.org
४) https://results.targetpublications.org
५) https://results.navneet.com
६) https://www.tv9hindi.com/education/board-exams/maharashtra-board-exams
७) https://education.indianexpress.com/boards-exam/maharashtra-hse-12-results
८) https://www.indiatoday.in/education-today/results
९) https://www.aajtak.in/education/board-exam-results

गेल्या वर्षी म्हणजेच सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात ठाणे जिल्ह्यातून बारावीच्या परिक्षेत ९२.०८ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते. यात, मुलींनी बाजी मारली होती. त्यामुळे २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात जिल्ह्यातील किती टक्के विद्यार्थी उत्तीर्ण होतायत आणि यंदाही मुलीच बाजी मारतायतं की, मुले याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात बारावीच्या परिक्षेसाठी ठाणे जिल्ह्यातून १ लाख २१ हजार २४४ विद्यार्थी परिक्षेला बसले होते. यंदा जिल्ह्यात एकही अतिसंवेदनशील किंवा संवेदनशील परीक्षा केंद्र नव्हते.

# उच्च न्यायालयाच्या निर्णयाला ठाणे महापालिकेचा हरताळ!

### आयुक्तांच्या आदेशानंतरही कारवाई नाहीच !

**मागील महिन्यात झालेल्या प्रशासकीय बैठकीत पुन्हा बेकायदा बांधकामांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. बेकायदा बांधकामाविषयी महापालिकेची भूमिका स्पष्ट असून राज्य सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या नियमावलीच्या आधारे सर्व सहाय्यक आयुक्तांनी बेकायदा बांधकामे, अतिक्रमणे यांच्या विरोधात काटेकोर कारवाई करावी, असेही आयुक्त राव यांनी सागितले होते. केवळ अनधिकृत बांधकामांवर कारवाई न करता अनधिकृत बांधकामांकडे दुर्लक्ष करणाऱ्या सहाय्यक आयुक्तांची देखील विभागीय चौकशी लावण्यात येणार असल्याची माहिती राव यांनी दिली होती. परंतु एवढे होऊनही अद्यापही या अनधिकृत बांधकामांवर कारवाई होतांना दिसून आलेली नाही.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे शहरातील अनधिकृत इमारतीचा प्रश्न गंभीर झाला आहे. प्रत्येक प्रभागात अनधिकृत इमारतींचे पेव फुटले आहे. याबाबत उच्च न्यायालयाने अनधिकृत इमारतीबाबत खडे बोल सुनावताना कारवाईचे आदेश दिले होते, परंतु एक वर्षानंतर देखील परिस्थिती जैसे थे तैसे असून काही प्रभागात अनधिकृत बांधकामे सुरूच आहेत. स्पष्ट आदेश देऊन देखील ठाणे पालिकेने अनधिकृत इमारतींवर कारवाई करण्यास चालढकल केली असून एकप्रकारे न्यायालयाच्या आदेशालाच हरताळ फासला आहे.

अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात काही प्रभाग कुख्यात झाले असल्याचा उल्लेख करत त्यांच्यावर वर्षभर पूर्ण ताकदीने कारवाई करणार असल्याची घोषणा महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केली होती. त्यानंतर अनधिकृत बांधकामांवर कारवाई होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. परंतु आजही नोंद असलेल्या ६६३ पैकी एकाही बांधकामावर कारवाई करण्यात आलेली नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यातही यात नव्या बांधकामांची भर पडली असल्याचेच चित्र दिसत आहे. मात्र उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्रत्येक प्रभाग समितीत कारवाई प्रस्तावित केल्याचा दावा महापालिकेने केला आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रातील सर्व प्रभाग समिती क्षेत्रात ७६९ बेकायदा बांधकामे असून त्यापैकी ६६३ बांधकामांची नोंद प्रभाग समितींच्या बीट निरीक्षकांनी बीट नोंदवहीत केल्याचे सांगत ती तोडण्याचे आदेश आयुक्तांनी दिले होते. तसेच या बांधकामांप्रकरणी त्यांनी सहाय्यक आयुक्तांना नोटीसा बजावल्या होत्या. त्यापाठोपाठ आता जमीन मालकासह बेकायदा इमारत उभारणाऱ्यांविरोधात एमआरटीपी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यासही सांगण्यात आले होते. परंतु त्यानंतरही महापालिकेच्या अतिक्रमण विभागामार्फत कोणतीही कारवाई झाली नव्हती.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर उद्या सुनावणी

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांशी संबंधित अनेक याचिका सर्वोच्च न्यायालयात प्रलबित आहेत. युती सरकारच्या २०२२ मधील अध्यादेशामुळे प्रभाग रचना आणि सदस्य संख्येशी संबंधित बदल झाले, ज्याला आव्हान देणाऱ्या याचिका दाखल झाल्या. या याचिकांवर २२ जानेवारी २०२५ रोजी सुनावणी झाली होती, आणि आता पुढील सुनावणी ६ मे २०२५ रोजी होणार आहे. या सुनावणी दरम्यान निवडणुकीच्या तारखांबाबत स्पष्टता येण्याची शक्यता आहे.**




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या तीन वर्षांपासून विविध कारणांमुळे रखडल्या आहेत. यामध्ये मुंबई महानगरपालिका (BMC) आणि राज्यातील इतर महापालिकांच्या निवडणुकांचा समावेश आहे. या निवडणुकांचा मुहूर्त ६ मे २०२५ रोजी निघण्याची शक्यता आहे, कारण सर्वोच्च न्यायालयात या निवडणुकांशी संबंधित याचिकांवर त्या दिवशी सुनावणी होणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासकीय पातळीवर निवडणूक तयारीला वेग आला आहे, तर राजकीय पक्षांमध्येही उत्सुकता आणि हालचाली वाढल्या आहेत.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुका पार पडल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे सर्व राजकीय पक्षांचे लक्ष लागले आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी प्रशासनाने तयारी सुरू केली असून, मतदार याद्या अद्ययावत करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. शुक्रवारी, २ मे २०२५ रोजी काही सरकारी कार्यालयांतील कर्मचाऱ्यांना बूथ लेव्हल ऑफिसर (BLO) म्हणून कामावर रुजू होण्याचे आदेश देण्यात आले. प्रत्येक BLO कडे दोन मतदान केंद्रांची जबाबदारी असते, आणि त्यांचे मुख्य काम मतदार याद्या अद्ययावत करणे, नावे समाविष्ट करणे किंवा वगळणे हे आहे. BLO च्या नियुक्तीला निवडणूक तयारीची पहिली पायरी मानली जाते, ज्यामुळे निवडणुकीचे बिगुल लवकरच वाजेल अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुका कोरोना काळापासून, म्हणजेच २०२२ पासून रखडल्या आहेत. त्यानंतर प्रभाग रचना, ओबीसी आरक्षण, आणि इतर कायदेशीर अडचणींमुळे निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या. सध्या सर्व महापालिकांमध्ये प्रशासकांद्वारे कारभार चालवला जात आहे, ज्यामुळे स्थानिक पातळीवरील विकासकामे ठप्प झाली आहेत.

ओबीसी आरक्षणाच्या विषयावरून सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाली आहे. त्यात प्रभाग फेररचनेचा मुद्दा आहे. त्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पूर्ण झाली नाही. राज्य सरकार आणि सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करणारे याचिकाकर्ते या दोघांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका हव्या आहेत. परंतु काही मुद्द्यांवर दोन्ही बाजूंमध्ये मतभेद आहेत. त्यामुळे हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले आहे. सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी निर्णय झाला नाही. यामुळे आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पावसाळ्यापूर्वी होण्याची शक्यता नाही. कारण होळीमुळे ९ ते १६ मार्च सर्वोच्च न्यायालयास सुटी आहे. त्यानंतर न्यायालयाकडून तारीख दिली जाईल त्या तारखेवर सुनावणी होईल. त्या तारखेला सुनावणी झाली नाही तर न्यायालयाला उन्हाळी सुट्टी लागेल. यामुळे हा विषय लांबणीवर पडण्याची शक्यता आहे.




# खैराची तोड : नागरिकांनी पकडून दिली वनविभागाने सोडून दिली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
बातमीदार

**मुरबाड दि. ४** मुरबाड तालुक्यातील माळशेज घाट अभयारण्यात मोडणा-हजारो हजारो हेक्टर व पट्टयात सध्या मोठ्या प्रमाणात जंगलतोड सुरू आहे, धसई लगत असलेल्या ओजिवले कातकर वाडी लगत ९ एकराचा वनविभागाच्या ताबेयात हा भूभाग असून या भूभागावर सालाबाद प्रमाणे त्याच त्यात खड्डयात पावसाळी वृक्षलीगवडीचं उद्दीष्टय साधले जातेय, नविन लागवड केलीलं झाड जगवली जात नाहीत व नैसर्गिक वाढझालेली झाडं वनविभागाच्या संगम मताने ठेकेदार तोड करीत असल्याची गंभिर बाब समोर येतेय येथील वनविभागातील खैराचीझाडे इलेक्ट्रीक कटरने कापून टेम्पोपिकप भरून चालविली असल्याची माहिती येथील अदिवासी माजी सरपंच किसन राजाराम वाघ सह नागरिकांनी तात्काळ वनविभागाला कळवून जागेवरच खैराची लाकडे भरलेली टेम्पो पकडून दिली मात्र सोमवारी सकाळी या बाबच टोकावडे वनविभागाला विचारणा केली असता अशा प्रकारची खैराचीझाडे तोड झालेली व टेम्पोत पकडून दिल्याची घटना घडलीच नसल्याचे सांगण्यात येताच ह्या अदिवासीवर कपाळावर हात मारण्याची पाळी आली. कुंपणच शेत खातय आत्ता दाद मागायची कुणा कडे?

वनविभागाला वनसंपदेवर ठेकेदारी कु-हाड फिरू लागल्याने आजच्या घडीला सर्वत्र वृक्षतोड सुरू आहे, जंगल तोडीला परवानगी असली तरी झाड तोडलेल्या जागेवर नविनझाड लावण्याचे आदेश जंगलतोड ठेकेदार व वनविभागाला देत असले तरी नविन झाड लावली जात नाहीत व आर्युवेदिक वनस्पतीजन्य झाड देखील तोडण्याचा



**याबाबत वनविभाग अधिकारी टोकावडे येथील वनपालांना विचारले असता अशी कोणतीही वृक्ष तोड झाली नसल्याचे सांगण्यात आले**

सपाटा जंलतोड करणा-या ठेकेदारांनी कायम ठेवल्याने मिल्हे, दुधनोल, धसई,कळंभे परिसर मानगांव ,बंगालपाडा, इंदे, माजगाव ,देहरी ,सायले ,शिळघर, संगम ,कासगांव ,या ठिकाणी बेहिशोबी वृक्षतोड सुरू असुन जंगल व टेकड्या उजाड करून ठेवल्या जात आहेत, तालुक्यात माळशेज घाट परिसर ते हरिचंद्रगड, भिंमाशंकर, कळसूबाई ,अभयारण्याच्या हद्दित शेकडो एकर जंगल पटटा येतो, नदिनाल्यावर पाण्याचा टिपुस नाही, त्यातच जंगळतोडीला दखील वनविभागच जबाबदार असून त्यांच्याच संगममताने जंगळाच माळरान होऊ घातल्याने वन्यप्राण्याचे वस्तीवरील वाढते मानवी अक्रमणाने वन्यप्राणी देखील गावाकडे येऊ लागल्याने त्याच्या मागावर असलेले हिस्त्रप्राणी वाघ, बिबटे हे, गावकडे येऊन मनुष्या प्राण्यासाठी घातक ठरू लागले आहेत, गावोगावी माकडांच्या झूंडी हैदोस घालताना नागरिक त्रस्त होऊ लागले आहेत, निलगाईच्या झूंडी भेंडी काकडी भाजीपाला बागायती फस्त करू लागल्या आहेत,एकंदरीत बेकायदेशीर वृक्षतोडीला आळा बसत नसल्याने या अभयारण्यातील प्राणी पक्षी अन्ना पैक्षा पाण्याच्या शोधात मनुष्यवस्ती कडे धाव घेऊ लागले आहे,काही पाण्या अभावी तडफडून मरत आहेत, वनविभागाने या वन्यप्राण्यासाठी जंगलात कृत्रीम पानवठे बनविले तर किमान पाण्याअभावी हे अभागी जिव जाणार नाहीत, परंतु स्थानिक वनविभाग मागणी करते परंतु वरिष्टा कडून त्यांना निधी उपलब्ध होत नाही, याच वनविभागाकडून करोडो रुपयांचे वनबंधारे, मातीचे बंधारे, सिंमेट बंधारे, बांधण्या साठी दर साल निधी येतो या बांधलेल्या बंधा-यांत फक्त गाळसाचलेला असतो, तरीही बंधारे बांधण्याचे सत्र सुरुच असतं , मात्र वन्यप्राण्यासाठी कृत्रीम पानवठ्यासाठी निधा मिळत नाही व जंगलतोडीला आळा बसत नसल्याने चिंता व्यक्त होत आहे.

# विरार-अलिबाग महामार्ग बाधित शेतकऱ्यांना मोबदल्याची प्रतीक्षा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. ४ :** ठाणे जिल्ह्यातील वाढत्या लोकसंख्येमुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडवण्यासाठी केंद्र तसेच राज्यातून एमएमआरडीएच्या माध्यमातून विरार-भिवंडी-अलिबाग हा नवीन महामार्ग तयार करण्याचे काम मंजूर झाले आहे. समृद्धी आणि कोकण एक्स्प्रेस-वेला जोडणारा हा महामार्ग एकीकडे महत्त्वाचा दुवा ठरणार आहे, तर दुसरीकडे भूसंपादनासाठी नोटिसा बजावल्या तरी मोबदल्याबाबत आश्वासन दिले नसल्याने शेतकरी हवालदिल आहे.

विरार-भिवंडी-अलिबाग असा १२६ किलोमीटरचा महामार्ग रायगड, ठाणे तसेच पालघर अशा तीन जिल्ह्यांना जोडणारा प्रमुख मार्ग आहे. या मार्गामुळे भिवंडी तालुक्यातील अलीमघर, हायवे दिवा, काल्हेर, कशेळी, केवणी, दिवा, खारबाव, खर्डी गावातील जमीन भूसंपादित केली जाणार आहे. शासन स्तरावरून या गावातील रहिवासी, नागरिक तसेच शेतकऱ्यांच्या जमिनीची मोजणी करून भूसंपादनाबाबत नोटिसा बजावण्यात आल्या आहेत, मात्र बाधित शेतकऱ्यांना कोणताही मोबदला देण्यात आलेला नसताना आता महामार्गात बदलाची चर्चा रंगल्याने प्रांत कार्यालयात खेटा मारत आहेत.




### भूसंपादनासाठी नोटिसा बजावल्या मात्र अद्याप मोबदला नाही !

**मुंबई महानगरातील प्रवेश नियंत्रित असा हा पहिलाच महामार्ग असणार आहे. मुंबई महानगर प्रदेशातील पालघर, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांच्या विकासात विरार-अलिबाग मल्टिमॉडेल कॉरिडॉर मोलाचा ठरणार आहे. या कॉरिडॉअरमध्ये आठ इंटरचेंज, २८ वाहन भूमिगत मार्ग, १६ पादचारी भूमिगत मार्ग आणि १२० कल्व्हर्ट असतील. संपूर्ण मार्ग आठ पदरी असून, २१ उड्डाणपूल, पाच टनेल, ४० मोठे आणि ३२ छोटे पूल प्रस्तावित आहेत.**

**महामार्ग पूर्ण झाल्यावर परिसरातील ग्रोथ सेंटर, एमआयडीसी आणि वसई-विरार, ठाणे, कल्याण-डोंबिवली, भिवंडी, नवी मुंबई, उरण-पनवेल या महानगरांसह जवाहरलाल नेहरू पोर्ट, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला मोठा लाभ होणार असून, येथील प्रवासी आणि अवजड वाहतूक वेगवान होण्यास मदत होणार आहे. या मार्गांबरोबर १३६ किलोमीटर लांबीची मेट्रो मार्गिका उभारण्याचेही प्रस्तावित आहे.**



## वाचक मनोगत

# मुलांच्या सुट्टीचा सदुपयोग करा !



समस्त शाळकरी मुलांच्या वार्षिक परीक्षा संपून आता उन्हाळी सुट्टी पडली आहे. शहरी भागांत लहान मुलांना एरव्ही शाळेत सोडले की गृहिणींना घरातील कामे करण्यास मोकळा वेळ मिळत असे. आता मात्र संपूर्ण दिवस मुले घरी असल्याने त्यांना काय हवे आणि काय नको याची पूर्तता करण्यामध्ये त्यांची पुरती दमछाक होत आहे. ज्यांची गावाला घरे आहेत ती कुटुंबे दरवर्षी गावाला जातात; मात्र ज्यांची नाहीत त्यांना मात्र या दिवसांत मुलांचे लाड पुरवण्याखेरीज अन्य पर्याय नसतो. यंदा उन्हाचा तडाखा खूपच असल्याने दुपारी मुलांना घराबाहेर खेळायलाही पाठवता येत नाही अशावेळी घरी त्यांचे हट्ट पुरवण्याचा त्रास नको म्हणून काही गृहिणी आपले मोबाईल मुलांच्या स्वाधीन करतात किंवा घरातील टीव्ही चालू करून देतात. त्यावर ही मुले दिवसदिवसभर गेम्स खेळत असतात किंवा रिल्स बघत असतात.

मुलांची ग्रहणक्षमता अधिक असल्याने ते जे पाहतात त्याचा परिणाम त्यांच्या कोवळ्या मनावर पटकन होतो. इंटरनेट विश्वात अनेक हिंसक गेम्सही आहेत. हे गेम्स पाहून तशा कृती ही मुले करण्याचा प्रयत्न करतात, गेम्समधील आभासी पात्रांना ते आपले आदर्श मानू लागतात. सातत्याने गेम्स पाहणारी मुले अधिक हिंसक किंवा भित्री होत असल्याचे मानसोपचार तज्ज्ञांनी संशोधनातून सिद्ध केले आहे. कार्टून्स पाहून ते तशाच प्रकारच्या हालचाली करू लागतात. हल्ली रिल्स बनवण्यावर कोणतेही बंधन नसल्याने रिल्स पाहता पाहता अनेकदा अश्लील किंवा शिव्यांचा मुक्त वापर असलेल्या रिल्स अचानकपणे मोबाईलवर येतात. अशावेळी मुलांच्या हाती मोबाईल सोपवणाऱ्या पालकांचीही पंचाईत होते याखेरीज मुलांच्या कोवळ्या डोळ्यांवर या मोबाईल्स आणि टीव्हीच्या किरणांचा परिणाम होऊन त्यांची दृष्टीक्षमता अल्प होते. एरव्ही शाळा, ट्युशन्स यांच्या व्यापात थोडा थोडका काळ मुलांना मोबाईल वापरायला मिळत असतो, सुट्टीच्या दिवसात मात्र प्रमाणाबाहेर मोबाईलच्या सानिध्यात मुले राहत असल्याने त्याचे विपरीत परिणाम त्यांच्या आरोग्यावर होतात. सुट्टीच्या दिवसांत अनेक राष्ट्रप्रेमी संघटना, मंडळे शालेय मुलांसाठी विविध शिबिरांचे आयोजन करतात. यापैकी बरीच शिबिरे ही विनामूल्य किंवा नाममात्र मूल्य घेऊन भरवली जातात.

सुट्टीच्या दिवसांत मुलांना मोबाईल किंवा टीव्हीचा नाद लावण्याऐवजी त्यांना अशा संस्कार, क्रीडा किंवा शौर्य शिबिरांना पाठवायला हवे. त्यासोबतच पालकांनी मुलांसाठी वेळ काढून त्यांच्याकडून श्लोक, स्तोत्र पाठांतर करून घ्यायला हवेत. देवतांचे अवतार, क्रांतिकारक, समाज सुधारक यांच्या कथा आणि जीवन चरित्रे त्यांना सांगायला हवीत. राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवरायांना लहानपणीच रामायण, महाभारत यांतील शौर्याचे आणि संस्कारांचे धडे दिले. ज्याचा परिणाम म्हणून शिवरायांनी शून्यातून हिंदवी स्वराज्य स्थापन केले. श्यामच्या आईच्या कथा तर आपण सर्वांनीच ऐकल्या आणि वाचल्या असतील. एरव्ही शाळा, शिकवण्या आणि अभ्यासात गुंतलेल्या मुलांवर चांगले संस्कार करण्यासाठी पालकांकडे हाच कालावधी असतो. हा वेळ मुलांना द्या, मुलांच्या सुट्टीचा सदुपयोग करा!

**विक्रांत माने, अंबरनाथ**

# निःसंतानता आणि आयुर्वेद

## पुरुष व स्त्री वंध्यत्वावर आयुर्वेदीय उपचारांचा वैज्ञानिक दृष्टिकोन





-डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे
M.D, B.A.M.S
(Ayurveda)

आजकाल निःसंतानतेची समस्या वेगाने वाढत आहे. विवाहित जोडप्यांना काही वर्षांनी मुलं होणं अपेक्षित असतं, मात्र काही जोडप्यांना गर्भधारणेच्या अडचणी येत आहेत. याला वैद्यकीय भाषेत 'निःसंतानता' (Infertility) असे म्हटले जाते. आयुर्वेदानुसार हे एक अत्यंत संवेदनशील, शारीरिक, मानसिक आणि भावनिक दृषटिकोनातून समजावं लागणारी समस्या आहे. निःसंतानतेचा प्रभाव केवळ शारीरिक पातळीवरच नाही तर मानसिक आणि सामाजिक पातळीवर देखील असतो.

आयुर्वेदात याचे मुख्य कारण म्हणजे शरीरातील दोषांचे असंतुलन आणि अपारंपारिक जीवनशैली. आयुर्वेदानुसार, गर्भधारणेसाठी चार मुख्य घटक आवश्यक आहेत: ऋतु (योग्य वेळ), क्षेत्र (गर्भाशय), अंबु (आहार व पोषण) आणि बीज (शुक्राणू व अंडाणू). या घटकांमध्ये अपत्यक्षमतेवर परिणाम करणारे कोणतेही दोष असले तरी गर्भधारणेची प्रक्रिया अडचणींत येते.

आयुर्वेदानुसार, स्त्रियांच्या निःसंतानतेची मुख्य कारणं म्हणजे मासिक पाळीचे अनियमित चक्र, अंडाशयातील विकार (PCOD), गर्भाशयातील दोष, रक्ताभिसरणातील अडथळा, एंडोमेट्रियोसिस, आणि अंडोत्सर्जनातील समस्या. याशिवाय मानसिक ताण, धूम्रपान, मद्यपान, सतत संगणक/मोबाईलचा वापर, चुकीचे आहारविहार, रात्री उशिरा झोप, प्रदूषण, प्रक्रिया केलेले (प्रेझर्व्हेटिव असलेले) अन्न यामुळे पुरुष व स्त्रियांमध्ये प्रजननक्षमतेवर परिणाम होतो. शारीरिक आरोग्य, भावनिक स्थिती, आणि आहार-विहाराचे संतुलन राखल्यास स्त्रीला गर्भधारणेसाठी आवश्यक पर्यावरण तयार होऊ शकते.

पुरुषांमध्ये शुक्राणूंची संख्या कमी होणे, गतिशीलता कमी होणे, किंवा शुक्राणूंची गुणवत्तेत घट होणे यामुळे देखील निःसंतानतेची समस्या उद्भवते. इतर कारणांमध्ये धूम्रपान, मद्यपान, प्रदूषण, अनियमित आहार आणि मानसिक ताण यांचा समावेश होतो.

आयुर्वेदाच्या दृष्टिकोनातून, निःसंतानता ही शारीरिक विकारांपेक्षा एक संपूर्ण जीवनशैलीतील असंतुलनाचा परिणाम आहे. यावर उपाय म्हणून आयुर्वेदाने संपूर्ण शरीर, मन आणि वातावरणावर लक्ष केंद्रित केले आहे. पंचकर्म, आहार, औषधी वनस्पती आणि योग यांचा समावेश करण्यात आलेला आहे. आयुर्वेदाच्या दृष्टिकोनातून शरीरातील दोषांवर प्रभावी उपचार केले जातात, जे गर्भधारणेसाठी उपयुक्त वातावरण निर्माण करतात.

पंचकर्म उपचार पद्धतीद्वारे शरीरातील दोष शुद्ध करून त्या प्रक्रियेची कार्यक्षमता वाढवली जाते. विशेषतः बस्ती, उत्तरबस्ती, विरेचन, अभ्यंग आणि शिरोधारा यासारखे उपचार गर्भाशय व बीजाशय शुद्ध करतात आणि त्यांची कार्यक्षमता सुधारतात.

आयुर्वेदात शतावरी, अश्वगंधा, गोक्षुर, विदारी, कांचनार, लोध्र, पुष्पधन्वा इत्यादी औषधी वनस्पती गर्भधारणेसाठी उपयुक्त मानल्या जातात. ही औषधे शारीरिक शक्ती वाढवतात, रक्ताभिसरण सुधारतात, आणि बीज व गर्भाशय कार्यक्षम बनवतात. योग आणि प्राणायाम मानसिक तणाव दूर करण्यासाठी खूप प्रभावी ठरतात. हे शरीराच्या हार्मोनल संतुलनाला सुधारतात आणि गर्भधारणेस अनुकूल वातावरण तयार करतात. सात्त्विक आहार, नियमित दिनचर्या, वयक्तिक स्वच्छता आणि वेळेवर झोप हे घटक आयुर्वेदाच्या उपचार पद्धतीत महत्त्वाचे आहेत. ताजे, पोषणकारक व उष्ण आहार घेणे आवश्यक आहे. अनियमितता आणि ताण कमी करून शरीराच्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याचे संरक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

निःसंतानता ही एक शारीरिकच नव्हे तर मानसिक आणि सामाजिक घडामोडीशी निगडीत असलेली समस्या आहे. आयुर्वेद हा एक संपूर्ण जीवनशास्त्र असून, निःसंतानतेचा इलाज केवळ औषधाने नव्हे, तर जीवनशैली सुधारून, शरीरशुद्धी करून आणि मनःशांती राखून केला जातो. त्यामुळे आयुर्वेदिक पद्धतीने नियमित व योग्य उपचार घेतल्यास स्त्री आणि पुरुष वंध्यत्वावर प्रभावी उपाय निश्चितच मिळू शकतो.

निःसंतानतेसाठी आयुर्वेदाची पारंपारिक व वैज्ञानिक पद्धती अनुसरणारे एक विश्वासार्ह केंद्र म्हणजे Ramayu Panchakarma Hospital and Wellness Centre. येथे अनुभवी आयुर्वेदाचार्यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण शरीर व मनाचा उपचार केला जातो. पद्धतशीर पंचकर्म उपचार, आहार, योग व प्राचीन आयुर्वेदिक औषधांचा समावेश करून संपूर्ण उपचार करण्यात येतात, ज्यामुळे गर्भधारणेस अनुकूल वातावरण तयार होते.

"Ramayu –Ancient wisdom for modern wellness" हे आमचं ध्येय आहे. आम्ही तुमचं आरोग्य व तुमच्या मातृत्वाचे स्वप्न साकार करण्यासाठी पूर्णपणे समर्पित आहोत.





**रामायु पंचकर्म हॉस्पिटल ॲण्ड वेलनेस सेंटर**
साईबाबा रोड, महागणपती मंदिराजवळ
टिटवाळा (पुर्व) संपर्क : 9920377799
ई-मेल: ramayupanchakarma@gmail.com
वेळा: सकाळी 10 ते संध्या. 7
(रविवार - आवश्यकतेनुसार खुले)


# विस्मृतीत गेलेले पुरणाचे कानोले



पुरणाचे कानोले ही एक लोकप्रिय मराठी मिठाई आहे, जी नागपंचमी आणि इतर विशेष प्रसंगी बनवली जाते. ही एक प्रकारची वाफवलेली पोळी असते, ज्यामध्ये पुरण (तांदळाचे पीठ, गूळ, आणि मसाले यांचे मिश्रण) भरलेले असते.

**कानोल्याची चव:**

कानोल्याची चव गोड आणि मऊ असते. पुरणाचे मिश्रण आणि वाफवलेल्या आवरणाचे मिश्रण एकत्र येऊन एक अप्रतिम चव निर्माण करते. कानोले हे एक स्वादिष्ट आणि सोपे पदार्थ आहे, जे तुम्ही घरी सहज बनवू शकता. हे विशेषतः नागपंचमी सारख्या सणांसाठी एक उत्तम मिठाई आहे.

**पुरणाचे कानोले**

साहित्य : 1 वाटी चण्याची डाळ, पाऊण वाटी बारीक चिरलेला गूळ किंवा साखर दोन्ही समप्रमाणात पाऊण वाटी इतकी, 1 छोटा चमचा वेलदोडा पावडर व 1 अख्खं जायफळ यांची एकत्र पूड, साजूक तूप 1 मध्यम चमचा, कणीक 6 मोठे चमचे, मैदा 1 मोठा चमचा.

**कृती :** प्रथम कणीक आणि मैदा एकत्र भिजवून घ्यावा. कणीक फार घट्ट वा फार सैल नको. चण्याची डाळ व 1 चमचा तांदूळ कुकरमध्ये शिजवून नंतर त्यात गूळ किंवा साखर घालून घट्टसर, गोळ्याला येईल इतपत परतावं व नंतर मिक्सरमधून वाटून घ्यावं. वाटून झालेल्या पुरणात वेलदोडा व जायफळ पूड घालावी व हलक्या हाताने एकत्र करावं.

पातेल्यात 1 वाटी पाणी, 1 चमचा साजूक तूप घालून उकळण्यास ठेवावं. पाण्याला उकळी आल्यावर पातेल्यात बसेल अशी चाळणी ठेवावी. भिजवलेल्या कणकेचा लिंबाइतका गोळा घेऊन त्याची पातळ पोळी लाटावी व त्यात पुरणाच्या पोळीत घालतो त्याप्रमाणे पुरणाचा गोळा घालून पोळी लाटावी. मध्यम झाली की परत एक पुरणाचा छोटा गोळा घेऊन परत पुरणाच्या पोळीप्रमाणे पोळी लाटावी. दोन वेळा असं पुरण घालून केलेल्या पोळीचा आकार त्रिकोणी होतो. अशा प्रकारे सर्व त्रिकोणी पोळ्या म्हणजेच कानोले तयार करून ते उकळत्या पाण्यावर ठेवलेल्या चाळणीत ठेवावे व त्यावर झाकण ठेवून 8-10 मिनिटं नीट वाफवून घ्यावेत. तयार कानोल्यावर साजूक तूप घालून खाण्याची पद्धत आहे.

**टीप :** 1. गहू पाखडायची लोखंडी चाळणी किंवा तशा प्रकारची कोणतीही चाळणी चालेल.

2. कुकरमध्ये चण्याच्या डाळीत आई थोडेसे तांदूळ टाकते. त्यामुळे उत्तम चव येते.

3. उकडीचे मोदक ज्याप्रमाणे उकडतात तसेच हे कानोले उकडायचे आहेत.

## कल्याण शहरातील नालेसफाईच्या कामांसाठी
# शहर अभियंता ॲक्शन मोडवर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण :** कल्याण डोंबिवली मनपा क्षेत्रातील दहा प्रभाग क्षेत्रातील मोठे नाले, मध्यम स्वरूपाचे नाले गटारांची पावसाळ्यापूर्वी ची स्वच्छता सफाई कोट्यवधीची कामे ठेकदारांमार्फत सुरू असल्याने या कामावर प्रशासनाचा अंकुश असतो. रविवारी ई प्रभागाक्षेत्रातील मोठे, नाले, मध्यम स्वरूपाचे नाले, गटाराच्या सफाई कामाची पाहणी शहर अभियंता अनिता परदेशी यांनी रविवारी केली. नालेसफाई कामात ठेकेदाराचा कामचुकार पणा, अपुरे मुन्यषबळ या गोष्टी नजरेत आल्याने शहर अभियंता अनिता परदेशी ऍक्शन् मोडवर आल्या असल्याची माहिती मिळाली.

कल्याण डोंबिवली मनपा क्षेत्रातील सुमारे 4कोटी रू. नाले सफाई कामे तसेच मध्यम स्वरूपाचे छोटे नाले, गटारे यांची सुमारे साडे तीन कोटी रू सफाई कामे विविध एजन्सीच्या ठेकेदारामार्फत सुरू असून पावसाळ्यापूर्वी मोठे नाले, मध्यम स्वरुपाची छोटे नाले, गटारे यांच्या मधील कचरा, तसेच डीप क्लीन करीत पावसाळ्यात पाण्याचा निचरा व्यवस्थित होईल. जेणेकरून लो लाईन् परिसरातील परिसरात संभाव्य पाणी शिरणार नाही यांची दक्षता घेतली जाते. जेणेकरून, सखल भागातील रहिवाशांना दिलासा मिळेल आणि पावसाळ्यात पाण्याची तुंबापुरी होणार नाही. यासाठी प्रशासन कोट्यवधीचा खर्च नालेसफाई साठी करते.

नालेसफाई कामे बरोबर होत आहेत का नाही. यासाठी पाहणी केली जाते. रविवारी केडीएमसी शहर अभियंता अनिता परदेशी यांनी " ई " प्रभाग क्षेत्रातील नालेसफाईची पहाणी केली असता त्यांच्या निर्दशानास आले की,

संजय नगर सागाव एमआयडीसी मधील नाला दिनांक 24 ते 28 एप्रिल या दरम्यान पूर्ण झाल्याचा अहवाल उपभियंता यांच्या बार चार्ट मध्ये दिसून येतो तथापि प्रत्यक्ष पाहणीत केलेले काम हे केवळ वरचा कचरा व जलपर्णी काढल्याचे दिसून येते नाल्याच्या दोन्ही बाजूचा काठ झाडे झुडपे काढून स्वच्छ केलेला दिसून आले नाहीत. इ प्रभाग क्षेत्रात एकूण 15 नाले असून केवळ दोन ठिकाणी काम सुरू आहेत व तेथे सुद्धा केवळ दहा ते बारा मजूर काम करीत आहेत ही संख्या पुरेशी नाही.

निळजे नाल्याचेही काम अगदी निकृष्ट पद्धतीने केले जात होते. या पाहणी दौऱ्यानिमित्ताने शहर अभियंता ह्या नालेसफाचा पोलखोलीमुळे संतापल्या असून त्या अँक्शन मोडवर आल्याची माहिती मिळाली असून नालेसफाई कामात दुर्लक्ष करणारे ठेकेदार वेळ काढू पणा करत आहेत व त्याबाबत कोणताही दैनंदिन पाठपुरावा उपअभियंता स्तरावर दिसून येत नाही. तसेच कामाचे प्रत्यक्ष ठिकाणाची एकत्रित पाहणी ठेकेदार व उपभियंता यांनी केलेली नाही, हा खूप बेजबाबदारपणा आहे. उपअभियंता हे रजेवर अथवा अन्य कामात व्यस्त असले तरी त्यांनी किमान दोन तासांनी भ्रमण दूरध्वनीवर ठेकेदारावर प्रेशर ठेवणे गरजेचे आहे, तसे दिसून आले नाही.

सुरू असलेल्या कामावर मी शहर अभियंता म्हणुन समाधानी नाही अशाच प्रकारे अन्य प्रभागाच्याही तक्रारी आहेत. सबब येत्या तीन दिवसात प्रभागातील सर्व कामामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे, अन्यथा ठेकेदार व उप अभियंता यांच्यावर नाईलाजास्तव कारवाई करणे भाग पडेल व त्यास आपण सर्वस्वी जबाबदार असाल, याची नोंद घ्यावी अशी तंबी शहर अभियंता अनिता परदेशी यांनी दिली असल्याने नालेसफाई कामात कामचुकार ठेकेदार, अधिकारी यांची आता खैर नसल्याचे चित्र यानिमित्ताने दिसत आहे.

# जात निहाय जनगणना




मागील आठवड्यात केंद्रीय मंत्रिमंडळाने जात निहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला. या संबंधीची घोषणा केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पत्रकार परिषदेत केल्यानंतर संपूर्ण देशातून जात निहाय जनगणनेचे स्वागतच करण्यात येत आहे. गेल्या काही वर्षांपासून विरोधकांसह अनेक सामाजिक संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांसह विरोधकांकडून सातत्याने जात निहाय जनगणनेची मागणी होत होती. विशेषतः विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी ही मागणी सातत्याने लावून धरली होती. उशिरा का होईना पण पण जात निहाय जनगणनेला मंजुरी देऊन सरकारने एक चांगला निर्णय घेलता आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच जात निहाय जनगणना होतेय हे विशेष याआधी इंग्रजांच्या काळात १८८१ ते १९३१ पर्यंत झालेल्या जनगणनेत जातींची गणना झाली होती. १९४१ च्या जनगणनेत देखील जातींची गणना करण्यात आली होती पण त्याची आकडेवारी जाहीर करण्यात आली नव्हती.

१९५१ साली स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदा जनगणना झाली या जनगणनेत जात निहाय जनगणना व्हावी अशी मागणी झाली होती मात्र तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी त्यास नकार दिला त्यांच्या मते जात निहाय जनगणनेमुळे जातिजातीत विभाजन होऊन राष्ट्रीय एकतेला बाधा पोहचू शकते त्यामुळे त्यांनी जात निहाय जनगणेस नकार दिला होता. मात्र या जनगणनेत अनुसूचित जाती आणि जमातींची गणना करण्यात आली तशी ती प्रत्येक जनगणनेत करण्यात आली कारण अनुसूचित जाती जमातींची जनगणना व्हावी असे घटनेतच नमूद करण्यात आले आहे. अनुसूचित जाती जमातींची गणना जनगणनेत केली जाते मात्र इतर मागासवर्गीय जातींची गणना करण्यात येत नव्हती ती आता करण्यात येईल. जात निहाय जनगणना हा एक चांगला निर्णय आहे. जात निहाय जनगणना झाल्याने सर्व जातींची लोकसंख्या मोजण्यात येईल त्यामुळे कोणत्या जातींची किती लोकसंख्या आहे ते समजेल. १९३१ साली झालेल्या जनगणनेत मागासवर्गीय जातींची लोकसंख्या ५२ टक्क्यांहून अधिक असल्याचे सांगण्यात आले होते.

मंडल आयोगाने इतर मागास वर्गाला आरक्षण देताना हीच लोकसंख्या ग्राह्य धरून इतर मागास वर्गाला २७ टक्के आरक्षण दिले होते. इतर मागास वर्गाची लोकसंख्या यापेक्षा अधिक आहे त्यामुळे २७ टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षण मिळायला हवे अशी मागणी इतर मागास वर्गाकडून होऊ लागली होती. आता जात निहाय जनगणना झाल्यामुळे सर्व जातींची लोकसंख्या मोजली जाईल त्यामुळे या वर्गाची नाराजी दूर होईल. जात निहाय जनगणना झाल्याने आरक्षणाची जी ५० टक्के मर्यादा आहे ती देखील वाढवली जाईल. सध्या सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाची मर्यादा ५० टक्के ठेवली आहे. जात निहाय जनगणनेमुळे संसद आणि विधान सभेचे चित्रही बदलू शकते. शिवाय जात निहाय जनगणना झाल्यावर प्रत्येक जातीच्या विकासासाठी त्यांच्या लोकसंख्येनुसार निधी उपलब्ध करून दिला जाईल. जात निहाय जनगणनेमुळे प्रत्येक जातीची शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि आर्थिक स्थितीबद्दल स्पष्टता येईल. या आकडेवारीत स्पष्टता आल्यावर सरकार त्यांच्यासाठी अधिक मजबूत धोरणे बनवू शकेल एकूणच जात निहाय जनगणना ही देशाच्या सामजिक आणि आर्थिक क्षेत्रावर दूरगामी परिणाम करणारी ठरेल. आता प्रश्न असा आहे की ही जात निहाय जनगणना होणार कधी ? जात निहाय जनगणने संदर्भातील विधेयक आगामी पावसाळी अधिवेशनात मांडले जाऊ शकते. म्हणजेच सप्टेंबर पासून जात निहाय जनगणनेची प्रारंभिक प्रक्रिया सुरू होऊ शकते. मात्र प्रत्यक्ष जात निहाय जनगणना एप्रिल २०२६ पासून सुरू होण्याची शक्यता आहे.

२०२१ सालीच ही जनगणना व्हायला हवी होती मात्र कोरोणामुळे ती पुढे ढकलण्यात आली आता ती पुढील वर्षी होण्याची शक्यता आहे. जनगणना ही दर दहा वर्षांनी होते. जनगणना ही दीर्घ चालणारी प्रक्रिया आहे. प्रत्यक्ष जनगणनेचे काम जरी काही महिनेच असले तरी त्यातून येणाऱ्या आकडेवारीचे प्रामाणिकिकरण आणि प्रकाशनासाठी एक दोन वर्ष लागतात म्हणजेच या जात निहाय जनगणनेची आकडेवारी २०२७ सालीच हाती येईल. या जात निहाय जनगणानेसाठी सुमारे १४ हजार कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे त्याची तरतूद आगामी अर्थसंकल्पात केली जाईल.

# भारताकडून पाकिस्तानला व्यापाराची दारे बंद




**जम्मू- काश्मीर मधील पहलगाममध्ये 22 एप्रिलला झालेल्या हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव सातत्यानं वाढतो आहे. भारतानं आता आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. भारताच्या डायरेक्टरेट जनरल ऑफ फॉरेन ट्रेडनं (डीजीएफटी) पाकिस्तानकडून होणाऱ्या सर्व आयातीवर पूर्णपणे बंदी घातली आहे.**

पाकिस्तानच्या जहाजांना भारताच्या बंदरात प्रवेश दिला जाणार नाही, असा आदेश डायरेक्टरेट जनरल ऑफ शिपिंगनं दिला आहे. पहलगाममधील हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांनी एकमेकाविरोधात विविध पावलं उचलली आहेत. भारतानं सिंधू जल करार स्थगित केला आहे. त्यानंतर या दोन्ही देशांनी एकमेकांसाठी हवाई क्षेत्रदेखील बंद केलं आहे.

22 एप्रिलला जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या कट्टरतावादी हल्ल्यात 26 जण मारले गेले होते आणि अनेकजण जखमी झाले होते. या पार्श्वभूमीवर डीजीएफटीनं 2 मे रोजी नोटिफिकेशन जारी करत म्हटलं, "पाकिस्तानकडून होणाऱ्या सर्व प्रकारच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष आयातीवर पुढील आदेश येईपर्यंत तात्काळ प्रभावानं बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे." 3 मे रोजी डायरेक्टरेट जनरल ऑफ शिपिंगनं सागितलं, "मर्चंट शिपिंग अ‍ॅक्ट 1958 च्या कलम 411 चा वापर करून हा आदेश देण्यात येतो आहे. पाकिस्तानचा झेंडा लावलेल्या जहाजाला भारताच्या कोणत्याही बंदरात येण्याची परवानगी दिली जाणार नाही." "तसंच, भारताचा झेंडा असलेलं कोणतंही जहाज पाकिस्तानच्या कोणत्याही बंदरात जाणार नाही."

तसं, पाहता भारत आणि पाकिस्तानात ऐतिहासिकदृष्ट्या फारसा व्यापार होत आलेला नाही. विशेषकरून सागरी मार्गानं दोन्ही देशांमध्ये मर्यादित आणि प्रतिकात्मकच व्यापार होत आला आहे. दोन्ही देश अरब समुद्रातून सागरी व्यापार करतात. मात्र, सुरक्षेच्या कारणांमुळे आणि राजनयिक तणावांमुळे दोन्ही देशांमधील व्यापारी जहाज एकमेकांच्या बंदरांपासून नेहमीच लांब राहिली आहेत. आकडेवारीतूनही दिसतं की, गेल्या काही वर्षांमध्ये भारत आणि पाकिस्तानमधील व्यापारात सातत्यानं घसरण झाली आहे. भारत सरकारच्या वाणिज्य मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, एप्रिल 2024 ते जानेवारी 2025 या कालावधीत भारतानं पाकिस्तानकडून 4 लाख 20 हजार डॉलर किंमतीच्या मालाची आयात केली आहे. तर त्याआधीच्या वर्षी म्हणजे एप्रिल 2023 ते जानेवारी 2024 या कालावधीत भारतानं पाकिस्तानकडून जवळपास 28 लाख 60 हजार डॉलर किमतीच्या मालाची आयात केली होती. दोन्ही देशांमधील निर्यातीबद्दल सांगायचं तर एप्रिल 2024 ते जानेवारी 2025 या कालावधीत भारताकडून पाकिस्तानला होणारी निर्यात घटून 44.765 कोटी डॉलरवर आली आहे.

तर एप्रिल 2023 ते जानेवारी 2024 दरम्यान भारताकडून पाकिस्तानला 1.1 अब्ज डॉलर किमतीच्या मालाची निर्यात झाली होती.



**सोमवार**
**०५ मे २०२५**

**मेष**
दिवस तुमच्यासाठी खास असणार आहे. जे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करत आहात ते साध्य होईल.

**वृषभ**
आज तुम्हाला तुमचे लक्ष्य साध्य करण्यासाठी अधिक मेहनत करावी लागेल. आरोग्य जपावे लागेल.

**मिथुन**
काम कितीही कठीण असले तरी एकाग्रता टिकवून ठेवावी लागेल. दिवस अनुकूल असणार आहे.

**कर्क**
आज तुम्हाला ऑफिसमध्ये नवीन प्रोजेक्ट मिळेल, तसेच खूप जुना तणाव आज दुपारी संपुष्टात येईल.

**सिंह**
तुमच्या सहकाऱ्यांची मदत मिळेल. मुलांकडून आनंद मिळेल. विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला

**कन्या**
आज तुम्ही तुमचे व्यावसायिक संपर्क मजबूत करण्याचा प्रयत्न कराल, जनसंपर्क दांडगा होईल.

**तूळ**
व्यवसायात एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीशी किंवा राजकारणी व्यक्तीशी भेटणे फायदेशीर ठरेल.

**वृश्चिक**
संयमाचा फायदा होईल. विरोधकांनी पेरलेल्या गोष्टींमुळे तुम्हाल अस्वस्थता वाटू शकते.

**धनु**
दिवस तुमच्यासाठी नवीन उत्साहाने भरलेला असणार आहे. व्यवसायात नफा मिळविण्यासाठी कष्ट कराल.

**मकर**
व्यापारात कोणाची तरी मदत घ्यावी लागेल. तसेच, आज तुम्हाला वादविवादांपासून दूर राहावे लागेल

**कुम्भ**
आज तुम्ही तुमच्या कामावर लक्ष केंद्रित करू शकाल. दिवस तुमच्यासाठी सुवर्ण दिवस असणार

**मीन**
तुमची वैयक्तिक समस्या सुटल्यानंतर तुम्हाला मानसिक शांती मिळेल. देवभक्तीत रमाल

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते आज महाराष्ट्र टेक लर्निंग वीक' चे उद्घाटन

## शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणाची टेकवारी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, दि. ४ :** प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या कौशल्य विकासासाठी, प्रशिक्षण संस्कृती निर्माण करण्यासाठी "टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग वीक" दि. ५ ते ९ मे दरम्यान मंत्रालयात साजरा करण्यात येणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता(AI), ब्लॉकचेन, सायबर सुरक्षा, कार्यशाळा व विचारमंथनाच्या प्रशिक्षण दिले जाणार असल्याची माहिती सामान्य प्रशासन विभागाच्या

अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी दिली आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमाचा शुभारंभ सोमवार दिनांक दि.५ मे २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ९ मे रोजी दुपारी ३.०० या कार्यक्रमाचा समारोप होणार आहे.

'टेक वारी' म्हणजे महाराष्ट्र शासन आयोजित पहिली डिजिटल वारी होय. आधुनिक तंत्रज्ञान व नवीन कल्पनांचा संगम असून 'टेक वारी' ही मंत्रालयातून सुरू होऊन महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांच्या कानाकोपऱ्यात तंत्रज्ञानाचा प्रसार करुन त्यामधून आधुनिक तंत्रस्नेही महाराष्ट्र घडविण्याची सुरुवात आहे. या 'टेक वारी' मध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन, सायबर सुरक्षा इत्यादी तंत्रज्ञानाबाबत सत्रे तसेच तणाव व्यवस्थापन, आरोग्यदायी जीवनशैली, ध्यानधारणा याबाबतच्या कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत. हे सर्व कार्यक्रम टेक वारीच्या

https://www.youtube.com/@TECH-%E0%A4%B5%E0%A4%BE%E0%A4%B0%E0%A5%80

या यू ट्यूब चॅनलवर तसेच माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या फेसबुक पेजवर (https://www.facebook.com/MahaDGIPR) पाहता येतील.

पहिल्या दिवशी दि. ५ मे रोजी मंत्रालयातील त्रिमुर्ती येथे 'प्रभावी व तणावमुक्त जीवन' या विषयावर श्री.प्रभु गौर गोपाल दास मार्गदर्शन करणार आहेत. दुपारी २:०० ते ३:०० या वेळेत मंत्रालयातील परिषद सभागृह, ६ वा मजला येथे "विकसित महाराष्ट्रासाठी फ्रंटियर तंत्रज्ञान" या विषयावर केंद्र शासनाच्या निती आयोगाच्या श्रीमती देबजानी घोष यांचे व्याख्यान होणार आहे. दुपारी ३:०० ते ४:०० या वेळेत मंत्रालयातील समिती सभागृह (कक्ष ३), ७ वा मजला येथे"शासकीय कामकाज डिजिटल पद्धतीने कसे करावे" या




विषयावर मायक्रोसॉफ्ट,नॅसकॉमचे श्री. मंदार कुलकर्णी यांचे व्याख्यान होणार आहे. दुपारी ४:०० ते ५:०० या वेळेत मंत्रालयातील परिषद सभागृह, ६ वा मजला "कृत्रिम बुद्धिमत्ता" याविषयी नवी दिल्लीचे माहिती तंत्रज्ञान विभागाचे अतिरिक्त सचिव अभिषेक सिंग यांचे व्याख्यान होणार आहे.

मंगळवारी दि.६ मे २०२५ सकाळी ११:३० ते १२:३० परिषद सभागृह, ६ वा मजला येथे 'तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर' या विषयावर परिषद सभागृह सहावा मजला येथे कृषी आयुक्त सुरज मांढरे आणि सह मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.विकास नाईक यांचे व्याख्यान होणार आहे. दुपारी २:०० ते ३:०० या वेळेत परिषद सभागृह, ६ वा मजला येथे "भाषिणी-भाषेचा अडसर दूर करणे" या विषयावर डिजिटल इंडिया भाषिणी विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अमिताभ नाग यांचे व्याख्यान होणार आहे. तसेच २:०० ते ३:०० त्रिमुर्ती प्रांगण येथे "प्रवास पाककृतींचा" या विषयावर डिजिटल जगातील महाराष्ट्रीयन पाककृतींची प्रणेती श्रीमती मधुरा बाचल यांचे व्याख्यान होणार आहे.दुपारी ३:०० ते ४:०० या वेळेत मंत्रालयातील सातवा मजला येथे समिती क्रमांक ३ मध्ये "इंटरनेट ऑफ थींग्ज (Internet of Things)" या विषयावर व्याख्यान होणार आहे.दुपारी ४:०० ते ५:०० या वेळेत परिषद सभागृह, ६ वा मजला येथे "ब्लॉकचेन टेक्नॉलॉजी" नेसकॉमचे लौकिक रग्जी यांचे व्याख्यान होणार आहे.

बुधवार दि.७ मे २०२५ तिस-या दिवशी सकाळी ११:३० ते १२:३० या वेळेत परिषद सभागृह, ६ वा मजला येथे 'सायबर सुरक्षा: या विषयावर नेस्कॉमचे प्रसाद देवरे आणि सुकृत घोष यांचे व्याख्यान होणार आहे. दुपारी २.०० ते ३.०० या वेळेत त्रिमूर्ती प्रांगण मंत्रालय येथे आहार तज्ञ ऋतुजा दिवेकर यांचे 'आरोग्यदायी जीवनशैली'या विषयावर व्याख्यान होणार आहे. सह्याद्री अतिथिगृह येथे दुपारी ३.०० ते ४.०० या वेळेत 'फ्रंटियर तंत्रज्ञानाद्वारे प्रशासन नव्याने परिभाषित करणे' या विषयावर केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाचे सचिव एस. कृष्णन यांचे व्याख्यान होणार आहे. दुपारी ३ ते ४ या वेळेत मंत्रालयातील सातवा मजला समिती सभागृह क्रमांक तीन येथे 'स्मार्ट बैठक आयोजित करणे'या विषयावर झूम नेस्कॉमचे शैलेश रंगारी, मेहेर उल्ली पालेम यांचे व्याख्यान होणार आहे.

गुरुवार दि.८ मे २०२५ – चौथ्या दिवशी सकाळी ११.३० ते दुपारी १२.३० या वेळेत "शासकीय कामकाजात फ्रंटियर तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर" या विषयावर परिषद सभागृह सहावा मजला मंत्रालय विस्तार येथे महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार, विभागीय आयुक्त नागपूरच्या विजयालक्ष्मी बिदरी, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंग यांचे या विषयावर व्याख्यान होणार आहे. दुपारी २ ते ३ या वेळेत त्रिमुर्ती प्रांगण येथे"जीवन संगीत" या विषयावर जीवन संगीत समर्थक संतोष बोराडे यांचे व्याख्यान होणार आहे.दुपारी ३:०० ते ४:०० या वेळेत समिती सभागृह सातवा मजला, समिती कक्ष क्रमांक ३ येथे 'कृत्रिम बुद्धिमत्ता'या विषयावर नेस्कॉमचे मनीष पोतदार,सरस्वती गोल्लेरकरी यांचे व्याख्यान होणार आहे. दुपारी ४:०० ते ५:०० परिषद सभागृह सहावा मजला येथे 'डब्यासाठीच्या आरोग्यदायी पदार्थांच्या पाककृती'या विषयावरती केटरिंग टेक्नॉलॉजी न्यूट्रिशन, इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटच्या अन्वेषा पात्रा यांचे व्याख्यान होणार आहे.

शुक्रवार दि. ९ मे २०२५ पाचव्या दिवशी सकाळी १०:३० ते १:३० समिती सभागृह सातवा मजला समिती कक्ष क्रमांक ३ येथे वेळेत कौशल्य विकास विभागाच्या अपर मुख्य सचिव मनिषा वर्मा यांचे "स्टार्टअप डेमो डे" या विषयी व्याख्यान होणार आहे.सकाळी ११:३० ते १२:३० या वेळेत समिती सभागृह सातवा मजला समिती कक्ष क्रमांक ३ येथे नॅसकॉमचे श्रीमती प्राजक्ता तळवेलकर, सुची गुप्ता, राहुल मुलाने यांचे "डिजिटली सजग बना" या विषयी व्याख्यान होणार आहे.महाराष्ट्राच्या संत परंपरां आणि भक्तिभावाला उजाळा देणाऱ्या "ज्ञानाची वारी" या सांस्कृतिक कार्यक्रमाने 'टेक वारीचा' समारोप होणार आहे दुपारी १२.३० ते २.३० या वेळेत हा कार्यक्रम त्रिमूर्ती प्रांगण येथे होणार आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत टेक वारी या कार्यक्रमाचा समारोप दुपारी ३.०० वाजता होणार आहे.

फूड दॅट हील्स' या उपक्रमांतर्गत पौष्टिक व पारंपरिक पाककृतींचे दररोज मेनू तयार केले जातील. तसेच विविध क्षेत्रातील २४ स्टार्टअप्सचे सादरीकरण होणार आहे.

# आदर्श शिक्षिका हेमलता भदाणे सेवानिवृत्त

## हेमलता भदाणे यांनी समर्पित भावनेने विद्यार्थ्यांना घडवलं - अनिल बोरनारे





दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण (प्रतिनिधी)** ज्ञानाच्या कक्षा रुंदावत असतांना विद्यार्थ्यांना बदलत्या काळानुसार पुस्तकी ज्ञानाबरोबर जीवन शिक्षण देणाऱ्या हेमलता भदाणे यांनी समर्पित भावनेने विद्यार्थ्यांना घडवलं असे प्रतिपादन शिक्षक नेते मुंबई मराठी अध्यापक संघांचे व मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष अनिल बोरनारे यांनी केले

उल्हासनगर येथील शांतीग्राम विद्यामंदिरच्या विद्यार्थिप्रिय शिक्षिका हेमलता भदाणे यांच्या सेवापूर्तीचा सोहळा कल्याण येथील शारदा विद्यामंदिरच्या सभागृहात संपन्न झाला त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोरनारे बोलत होते यावेळी ब्राह्मणपाडा सोसायटीच्या चेअरमन स्नेहा गावडे जवाहर बाल भवन नियमक मंडळाचे सदस्य प्रशांत भामरे, राज्याचे मंत्री इंद्रनील नाईक यांचे खाजगी सचिव उद्धव भामरे

मुंबई क्रेडिट सोसायटीचे चेअरमन विशाल बावा निवृत्त एअर फोर्स ऑफिसर यादवराव पाटील, पालघर जिल्हा नियोजन अधिकारी प्रशांत भामरे हेमलता भदाणे यांचे सुपुत्र व चित्रपट कलावंत ललित प्रभाकर यजमान प्रभाकर भदाणे ज्येष्ठ भगिनी विजया पाटील मातोश्री शकुंतला देसले आदी उपस्थित होते.

दैनंदिन अध्यापनासोबत हेमलता भदाणे यांनी मराठी अध्यापक संघ भूगोल संघात स्वतः ला सक्रिय ठेवले. आपल्या विषयाबाबत स्वतःला अद्ययावत ठेऊन ३३ वर्षे विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन केले. मराठी विषयाचा अभ्यास करून शोध निबंध सादर केला पुनर्रचित अभ्यासक्रमात तज्ञ मार्गदर्शक म्हणून काम करून शिक्षकांना मार्गदर्शन केले असेही बोरनारे यांनी सांगितले

हेमलता भदाणे यांच्या ३३ वर्षाच्या अध्यापन व इतर सामाजिक कार्यावर आधारित अंकाचे प्रकाशनही प्रमुख मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले या अंकात अनेक मित्र मैत्रिणींनी भदाणे यांचे कार्य अधोरेखित केले

# विकासक रहिवाशांना घरे देण्यास असमर्थ

## बारा वर्षांपासून रखडला झोपडपट्टी पुनर्वसन विकास प्रकल्प

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
बातमीदार

**ठाणे :** नौपाडा येथील प्रशांतनगर भागात झोपडपट्टी पुनर्वसन विकास प्रकल्प मागील १२ वर्षांपासून रखडला आहे. पुरेशी संधी आणि वेळ देऊनही विकासक रहिवाशांना घरे देण्यास असमर्थ ठरत असल्याने झोपडपट्टी पूनर्विकास प्राधिकरणाच्या (एसआरए) बैठकीत आमदार संजय केळकर यांनी संताप व्यक्त केला. तर एसआरए विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी विकासकाला १५ दिवसांची अंतिम मुदत दिली आहे. मुदतीत निर्देशांचे पालन झाले नाही तर नवीन विकासक नेमण्याचा इशाराही त्यांनी दिला.

नौपाडा परिसरातील प्रशांत नगर ही जुनी वसाहत आहे. येथे १२ वर्षांपूर्वी सुरू झालेल्या एसआरए प्रकल्पाचे काम एसटीजी ग्रुपचे हरीश दौलतानी यांनी हाती घेतले आहे. गेल्या १२ वर्षात विकासकाला इमारती पूर्ण करण्यात पूर्णपणे अपयश आले असून रहिवासी हक्काच्या घरांपासून वंचित राहिले आहेत.

विशेष म्हणजे रहिवाशांना नियमित भाडे देण्यातही विकासक अपयशी ठरल्याचा दावा रहिवाशांनी केला. याबाबत येथील श्री स्वामी समर्थ सहकारी गृहनिर्माण संस्थेने आमदार संजय केळकर यांच्या नेतृत्वाखाली गेल्या काही वर्षापासून लढा सुरू ठेवला आहे. त्यानुसार केळकर यांनी विकासक, रहिवासी, ठाणे महापालिकेचे अधिकारी आणि एसआरए अधिकारी यांच्यात समन्वय साधून बैठकाही घेतल्या तसेच विकासकाला पुरेशी संधी आणि वेळही दिली. तरीही विकासक प्रकल्प पूर्ण करण्यात अपयशी ठरल्याने केळकर यांनी एसआरए विभागाच्या कार्यालयात संयुक्त बैठक घेतली. यावेळी एसआरएचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण हे व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून उपस्थित होते.

### विकासकाला पाठीशी घालणाऱ्यांना सोडणार नाही - आमदार संजय केळकर

**विकासकाने गेल्या १२ वर्षांत रहिवाशांच्या आणि विक्रीच्या इमारती देखील अपूर्णच ठेवल्या असून रहिवासी आणि इतर खरेदीदारांची फसवणूक केली आहे. घोडबंदरमध्ये देखील या विकासकाने फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रशांत नगर येथील रहिवाशांची देखील त्याने फसवणूक केली असून विकासकाला कोणी पाठीशी घालणार असेल तर त्यांनाही आम्ही सोडणार नाही, असा इशारा आमदार संजय केळकर यांनी दिला आहे.**



# रस्त्यावर कचरा फेकाल तर दाखल्यांना मुकाल !

## नेवाळी ग्रामपंचायतीचा कडक इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथः** मुंबई, ठाण्याहून डोंबिवलीजवळच्या काटई नाक्याहून अंबरनाथ, बदलापूर असा प्रवास करताना रस्त्याच्या कडेला दुतर्फा चाळी आणि कचऱ्यांचे ढीग पाहायला मिळतात.

स्थानिक ग्रामपंचायतींना कचरा मोठी डोकेदुखी ठरू लागली आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीने आता रस्त्याच्या कडेला कचरा फेकणाऱ्या ग्रामस्थांना थेट इशारा दिला आहे. रस्त्यावर कचरा फेकाल तर शासकीय दाखल्यांना मुकाल, असा इशाराच येथील नेवाळी ग्रामपंचायत प्रशासनाने दिला आहे. या कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरत असून कचऱ्याला आग लागल्यास रस्त्यावर धुराचे साम्राज्य पसरते.

ठाणे जिल्ह्यातील सर्वच महत्त्वाच्या महापालिका आणि नगरपालिकांच्या वेशीवर मोठ्या प्रमाणावर नागरिकरण होते आहे. शहरांची क्षमता संपल्याने बांधकाम व्यवसायिक आणि नोकरदार वर्गाने शहराला खेटून असलेल्या ग्रामपंचायतींमध्ये आपला मोर्चा वळवला. त्यामुळे अचानक या ग्रामपंचायती विस्तारल्या. शहरांच्या धर्तीवर येथे लोकसंख्या स्थलांतरित झाली. मात्र ग्रामपंचायती प्रशासनाचा आवाका लहान असल्याने येथे प्राथमिक सोयीसुविधा पुरविण्यात अडचणी येऊ लागल्या.

कल्याण डोंबिवली महापालिकेच्या वेशीवर आणि अंबरनाथ तालुक्यात असलेल्या अनेक ग्रामपंचायतींची हीच अवस्था आहे. त्यात अंबरनाथ काटई रस्त्यावर नेवाळी, खोणी अशा अनेक ग्रामपंचायती मोठ्या प्रमाणावर वाढल्या. राज्यमार्ग जात असल्याने असंख्य दुकाने, चाळी या ठिकाणी उभ्या राहिल्या. मात्र या चाळींमधून निघणारे सांडपाणी, कचरा याचे व्यवस्थापन झाले नाही. आज मुंबई तसेच ठाण्याहून काटई नेवाळी रस्त्याने प्रवास करत असताना रस्त्याच्या बाजूंना कचऱ्याचे ढिगारे पाहायला मिळतात. या ढिगाऱ्यांना अनेकदा आग लावली जाते. त्यातून धूर बाहेर पडत असताना रस्त्यावरील दृश्यमानता कमी होते. त्यामुळे अपघाताची शक्यता असते. धुरामुळे शेजारच्या रहिवाशांचे आरोग्यही धोक्यात येते. काही दिवसांपूर्वी स्थानिक नेवाळी ग्रामपंचायतीने या कचऱ्याला शिस्त लावण्यासाठी येथे फलक लावले. नागरिकांना येथे कचरा न टाकण्याचे आवाहन केले. कचरा घंटागाडीतच द्यावा असेही आवाहन स्थानिक ग्रामस्थांना करण्यात आले. मात्र त्यानंतरही काही ग्रामस्थ रस्त्यावर त्याच ठिकाणी कचरा टाकत असल्याचे निदर्शनास आले.

त्यामुळे आता नेवाळी ग्रामपंचायतीने आक्रमक भूमिका घेत कठोर पावले उचलण्याचे संकेत दिले आहे. नेवाळी ग्रामपंचायतीने रस्त्यावर कचरा टाकणाऱ्या नागरिकांना इशारा दिला असून येथे कचरा टाकणाऱ्याला शासकीय दाखल्यापासून वंचित राहावे लागेल असे ग्रामपंचायती प्रशासनाने सांगितले आहे. येथे कचरा टाकल्यास दंड आकारला जातो आहे. त्या दंडाची रक्कम भरल्यानंतरच आपल्याला शासकीय दाखला जारी होईल, असेही ग्रामपंचायत प्रशासनाने सांगितले आहे. त्यामुळे आता या आवाहनाला स्थानिक रहिवासी कसा प्रतिसाद देतात हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.



# मीरा-भाईंदरच्या नाल्यांतील गाळ झाडांच्या 'मुळावर'

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** नालेसफाईच्या कामादरम्यान नाल्यातील गाळ थेट झाडांच्या खोडांवर टाकण्यात येत असल्याचा प्रकार मिरारोड येथे उघडकीस आला आहे. या प्रकारामुळे पर्यावरणप्रेमींनी पालिकेच्या कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला आहे. मिरा-भाईंदर शहरात सध्या महापालिकेमार्फत अंतर्गत नाल्यांची सफाई केली जात आहे. या मोहिमेत नाल्यातील गाळ रस्त्याच्या कडेला काढून ठेवण्यात येतो आणि तो दोन दिवसांनी सुकल्यानंतर उचलला जातो. मात्र, मिरा रोड येथील विनय नगर परिसरात हा गाळ थेट झाडांच्या खोडांवर टाकण्यात येत असल्याचे आढळून आले आहे. या परिसरातील सुशोभीकरण केलेली झाडे अशा प्रकारामुळे पुन्हा घाणीत अडकली आहेत.

नाल्यातील गाळामध्ये अनेक घातक रसायने आणि जंतू असतात, जे झाडांच्या आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक ठरू शकतात. त्यामुळे प्रशासनाच्या या निष्काळजी कृतीमुळे पर्यावरणप्रेमींमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. यापूर्वीही झाडांच्या खोडांवर डांबर, सिमेंट, तसेच कचरा टाकण्याचे प्रकार घडले होते. मात्र, प्रशासनाकडून या गोष्टींकडे वारंवार दुर्लक्ष करण्यात येत असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते कृष्णा गुप्ता यांनी केली आहे. तर यासंदर्भात तक्रार प्राप्त होताच संबंधित गाळ हटवून परिसर स्वच्छ करण्यात आला असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे.

**कंत्राटदाराला नोटीस :**

**झाडांच्या खोडावर नाल्याचा गाळ टाकण्यात येत असल्याची तक्रार कृष्णा गुप्ता यांनी महापालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडे केली होती. त्यावरून नाले सफाई करणाऱ्या कंत्राटदाराला प्रशासनाने नोटीस बजावली असून या प्रकरणी खुलासा सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.**

# मेट्रोच्या कामासाठी भिवंडीतील वाहतुकीवर निर्बंध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे- भिवंडी-कल्याण या मेट्रो पाच मार्गिकच्या निर्माणाचे काम भिवंडी शहरात सुरू आहे. या कामासाठी भिवंडी येथील धामणकर नाका भागात ठाणे वाहतुक पोलिसांनी वाहतुक बदल लागू केले आहे. हे वाहतुक बदल आज, रविवारी रात्री ११ ते सोमवारी पहाटे पाच आणि सोमवारी रात्री ११ ते मंगळवारी पहाटे पाच यावेळेत लागू असतील.

ठाणे, भिवंडी शहरातील वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी मेट्रो मार्गिकचे जाळे उभारले जात आहे. कल्याण, भिवंडीहून हजारो नागरिक रस्ते मार्गाने ठाणे शहरात वाहतुक करत असतात. त्यामुळे रस्त्यावरील वाहनांचा भार कमी करण्यासाठी ठाणे-भिवंडी-कल्याण या मेट्रो पाच मार्गिकच्या निर्माणाचे काम सध्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून ठाणे आणि भिवंडी शहरात सुरू आहे. आजपासून मध्यरात्री भिवंडी येथील धामणकर नाका भागात तुळई उभारणीचे काम केले जाणार आहे. त्यामुळे ठाणे वाहतुक

**रविवारी रात्री ११ ते सोमवारी पहाटे पाच आणि सोमवारी रात्री ११ ते मंगळवारी पहाटे पाच यावेळेत वाह्तुकीत बदल लागू असतील.**

पोलिसांनी वाहतुक बदल लागू केले आहे.

वाहतुक बदल असे आहेत

नारपोली, मानकोली येथून कल्याण नाकाच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या वाहनांना अंजुरफाटा चौक येथे प्रवेशबंदी असेल. येथील जड-अवजड वाहने अंजुरफाटा चौकातून वळण घेऊन वाहतुक करतील. तर हलकी वाहने रतन सिनेमा येथून डावे वळण घेऊन वाहतुक करतील.

कल्याणनाका येथून नारपोली, मानकोलीच्या दिशेने वाहतुक करणाऱ्या जड अवजड वाहनांना धामणकर नाका भागात प्रवेशबंदी असेल. येथील वाहने कल्याणनाका येथून डावे वळण घेऊन खडी मशीन मार्गे वाहतुक करतील. हे वाहतुक बदल आज, रविवारी रात्री ११ ते सोमवारी पहाटे पाच आणि सोमवारी रात्री ११ ते मंगळवारी पहाटे पाच यावेळेत लागू असतील.







# ठाणे पोलिस दलातील तीन कर्मचारी निलंबित

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे पोलिस दलातील तीन कर्मचाऱ्यांनी मुंबईतील एका दाम्पत्याला धमकावून त्यांच्याकडून ५० हजार रुपये उकळल्याचे प्रकरण उघडकीस आले असून या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन ठाणे पोलिस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या आदेशाने ठाणे अप्पर पोलिस आयुक्त (प्रशासन) श्रीकांत पाठक यांनी तिघांना तातडीने निलंबित केले आहे. पोलीस शिपाई जयेश आंबिकर, राकेश कुंटे आणि महिला पोलिस शिपाई सोनाली मराठे अशी निलंबित करण्यात आलेल्या तिघांची नावे आहेत. यातील जयेश आणि राकेश या दोघांची नेमणूक ठाणे पोलिस मुख्यालयात होती आणि ते पोलीस आयुक्तांच्या एस्कॉर्ट वाहनावर नेमणूकीला होते. तर, सोनाली यांची नेमणुक शीळ डायघर पोलीस ठाणे येथे होती.

# आबीएन लोकमतचे पत्रकार गणेश गायकवाड यांना मातृशोक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता **बदलापूर:** बदलापुरातील आयबीएन लोकमतचे पत्रकार गणेश गायकवाड यांच्या मातोश्री मंजुळा अनंत गायकवाड (६५) यांचे शनिवारी (ता.३) रात्री अल्पशा आजाराने दुखद निधन झाले. मुंबईतील केईएम रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. तेथेच त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रविवारी बदलापूर पश्चिमेकडील मोहनानंद नगर स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

दैनिक
जीवनदीप वार्ता
ठाणे ■ सोमवार
■ ०५ मे २०२५
jeevandeepvartanews2020@gmail.com



# जितेंद्र आव्हाड यांच्या हस्ते रमझान शेख यांच्या जनसेवा कार्यालयाचे उद्घाटन

**कल्याण :** राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस तसेच विधिमंडळ गटनेते आमदार डॉ.जितेंद्र आव्हाड यांच्या हस्ते तसेच ठाणे जिल्हा अध्यक्ष सुहास देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र प्रदेश संघटक सचिव रमझान शेख यांच्या पक्ष कार्यालयाचा उद्घाटन सोहळा मोठ्या जल्लोषात पार पडला. जितेंद्र आव्हाड यांच्या उपस्थितीमुळे या नव्या कार्यालयाद्वारे पक्षाचे संघटन अधिक मजबूत होईल आणि जनतेपर्यंत थेट पोहोचता येईल. तसेच या कार्यालयाच्या माध्यमातून स्थानिक जनतेच्या अडचणी ऐकून घेणे, पक्षाची ध्येयधोरणे पोहोचवणे व युवकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हे प्रमुख उद्दिष्ट राहील, असे रमझान शेख यांनी सांगितले. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश युवक सरचिटणीस राजेश कदम, ठाणे जिल्हा प्रशासन सरचिटणीस राजेश साटम, ठाणे शहर सचिव सुनिल कुऱ्हाडे, शीळ विभाग अध्यक्ष गणेश मुंडे, खारघर शहराध्यक्ष ज्ञानेश्वर शिंदे, शहर सरचिटणीस मंथन कांबळे, इकबाल शेख यांच्यासह स्थानिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# एमआयडीसीतील आनंद दिघे उद्यान महिनाभरापासून कुलूपबंद

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



**डोंबिवली :** एमआयडीसी निवासी मधील कल्याण डोंबिवली महापालिकेचे धर्मवीर आनंद दिघे उद्यान हे सुरक्षारक्षक ठेकेदाराचा ठेका संपल्याने तेथे सुरक्षारक्षक नसल्याने गेला महिनाभर पासून सदर हे उद्यान कुलूपबंद असून उघडले जात नाही. या उद्यानाचा मुख्य दरवाजाला टाळे, कुलूप लावले असल्याने एप्रिल मे महिना सुट्टीत मुलांना खेळण्यासाठी मिळाले नाही तसेच ज्येष्ठ व इतर नागरिकांना येथील जॉगिंग ट्रॅक, ओपन जिमचा वापर उद्यान बंद असल्याने करता येत नाही. याच उद्यानातील ठेवलेल्या बाकड्यावर बसुन ज्येष्ठ नागरिक हे विश्रांती, गप्पागोष्टी करीत असतात. परंतु उद्यानात त्यांना जाता येत नसल्याने त्यांची पंचाईत आता झाली आहे.

सदर या उद्यानात विविध प्रकाराची लहान मोठी झाडे असून त्यांना उन्हाळयाच्या दिवसांत पाण्याची आवश्यकता असते. ठेकेदारामार्फत ठेवलेला सुरक्षारक्षक हा उद्यानातील झाडांना पाणी देत होता. गेले महिनाभर झाडांना पाणी मिळत नसल्याने या उद्यानातील झाडे मरणासन्न, सुकली तर याला जबाबदार कोण राहणार आहे. सध्या कडक ऊन पडत असताना उद्यानात असलेल्या झाडांमुळे येथील परिसरात काहीसा थंडावा येत असतो तसेच प्रदूषण मुक्त वातावरण निर्माण होत असते. या उद्यानामुळे येथील परिसराची शोभा आणि सुंदरता वाढली होती. यापूर्वीही या उद्यानाची नियमित देखभाल दुरुस्ती ही कल्याण डोंबिवली महापालिकेकडून होतांना दिसत नव्हती.

सदर उद्यानाला लागलेले टाळे उघडावे आणि सुरक्षारक्षक ठेकेदाराची नेमणूक त्वरित करावी अथवा तोपर्यंत उद्यान विभागातील एखाद्या कर्मचाऱ्याला तेथे देखभाल व उद्यान उघडण्यासाठी सांगण्यात यावे, यासाठी येथील माजी नगरसेवक भालचंद्र म्हात्रे आणि शिवसेना शाखाप्रमुख सागर पाटील यांनी कल्याण डोंबिवली महापालिकेचा उद्यान विभागाकडे पाठपुरावा करीत आहेत. परंतु प्रशासनाने अद्यापही कोणतीही कार्यवाही केली नाही. झाडे लावा झाडे जगवा ! हे सरकारी धोरण असताना शिवाय डोंबिवलीत उद्यानाची कमतरता असतानाही सुस्त प्रशासन अद्याप यावर लक्ष देत नाही. याबाबत उद्यान विषयक अभियंता संजय जाधव यांच्याशी संपर्क असता संपर्क झाला नाही.

## कल्याणच्या योगिधाम परिसरातील धक्कादायक घटना
# सतराव्या माळ्यावरून उडी घेत महिलेने संपवलं जीवन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण योगिधाम परिसरात ही धक्कादायक घटना घडली आहे. योगिधाम परिसरात 35 वर्षीय महिलेने 17 व्या मजल्यावरून उडी मारून आत्महत्या केल्याने खळबळ उडाली. खडकपाडा पोलिसांचा या घटनेचा तपास सुरू आहे. ही महिला लिफ्टमधून 17 व्या मजल्यावर जातानाची घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

**17व्या मजल्यावर जात असताना सीसीटीव्ही कॅमेरात कैद**

मिळालेल्या माहितीनुसार, कल्याण योगिधाम परिसरात एका इमारतीच्या 17 व्या मजल्यावरून उडी मारत 35 वर्षीय महिलेने आत्महत्या केल्याची घटना काल (शनिवारी) सायंकाळच्या सुमारास घडली. ही महिला या इमारतीमध्ये राहत नसून ती बाहेरून इमारतीमध्ये आल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली आहे. ही महिला लिफ्टने 17व्या मजल्यावर जात असताना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाले आहे. दरम्यान घटनेची माहिती मिळताच खडकपाडा पोलिसांनी घटना स्थळी धाव घेत घटनेची नोंद करत पुढील तपास सुरू केला आहे. या महिलेची ओळख अद्याप पटलेली नसून ही महिला कुठे राहत होती? ती या इमारतीमध्ये का आली? या महिलेने आत्महत्या का केली? याचा तपास पोलीस करत आहेत.



या घटनेबाबत माहिती देताना योगिधाम फेडरेशनचे अध्यक्ष नितीन जाधव यांनी सांगितलं की, दुपारच्या सुमारास मला फोन आला होता. मी इमारतीजवळ येऊन पाहिलं तर एका महिलेने 17 व्या मजल्यावरून उडी मारली होती. नंतर माहिती घेतली असता, ती अनोळखी महिला होती. ती बाहेरून आली होती. ती येथील रहिवासी नाही, अशी माहिती समोर आली आहे.

**नेमकं काय घडलं?**

या कॉम्प्लेक्समध्ये ही महिला बाहेरून आली होती. ती अगदी शांतपणे लिफ्टमधून 17व्या मजल्यावर जात असताना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाले आहे. त्यानंतर तिने उडी मारून आपलं जीवन संपवलं. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तपास सुरू केला आहे. खडकपाडा पोलिसांनी घटना स्थळी धाव घेत घटनेची नोंद करत पुढील तपास सुरू केला आहे. या महिलेची ओळख अद्याप पटलेली नसून ही महिला कुठे राहत होती? ती या इमारतीमध्ये का आली? या महिलेने आत्महत्या का केली? याचा तपास पोलीस करत आहेत.

# फुले' चित्रपट टॅक्स फ्री करा
## - अनिल नाचपल्ले यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी)** 25 एप्रिल 2025 रोजी दिग्दर्शक अनंत महादेवन यांचा 'फुले' हा चित्रपट जगभरात प्रसिद्ध झाला. या चित्रपटासाठी प्रेक्षकांची मोठी पसंती मिळत आहे. हा चित्रपट अधिकाधिक लोकांना पाहायला मिळावा यासाठी तो चित्रपट आपल्या महाराष्ट्रात टॅक्स फ्री करण्यात यावा अशी राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी आहे. महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी तसेच दिन दलित उद्धारासाठी महाराष्ट्रामध्येच नव्हे तर देशामध्ये एक क्रांती केलेली आहे. त्यांच्या कार्याचा प्रभाव इतका मोठा आहे की जसा 19 व्या शतकात त्याना विरोध झाला तितकाच विरोध २१ व्या शतकातही या चित्रपटाला झालेला पाहायला मिळाला.

परिणामी चित्रपटातील जवळपास 12 सीन्स सेन्सार बोर्डाने कमी केले. परंतु म.ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई यांच योगदान आणि विचार यामुळे तोकडे पडणार नाहीत. माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देण्यासाठी लढणाऱ्या दांपत्याचा हा संघर्षप्रवास प्रत्येकाने पाहायला हवा. चित्रपटातून आपल्याला समाज उन्नतीसाठी उभारलेल्या चळवळीचा जीवनप्रवास पाहायला मिळतो. त्यामुळे आमची आपणास विनंती आहे की "फुले" चित्रपट टॅक्स फ्री करत अधिकाधिक लोकापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. परिवर्तनवादी, पुरोगामी महाराष्ट्र घडवणाऱ्या महान व्यक्तिमत्त्वांचा सन्मान झाला पाहिजे. आपल्या गौरवशाली इतिहासाचा ठसा प्रत्येकाच्या मनात उमटला पाहिजे. आपण या सर्व महामानवाना अभिप्रेत असलेली समाजरचना निर्माण करण्यात निश्चितच योगदान देत आहात याची आम्हाला पूर्णपणे कल्पना आहे. बहुजन समाजातील लोकांना आजही शिकण्यासाठी अडचणी आहेत. त्यामुळे शिक्षणाचे महत्व आजच्या पिढीला कळावे यासाठी हा चित्रपट महाराष्ट्रामध्ये टॅक्स फ्री करण्यासाठी आपण योग्य त्या उपाययोजना कराव्यात अशी आपणाकडे राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाची विनंती आहे.

# कल्याण शहर रिक्षा संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** रिक्षा चालक मालक असोसिएशन कल्याण शहर संघटनेची वाषीक सभा नुकतीच संपन्न झाली, प्रथम सुरूवातीला पहलगाम जम्मुकाश्मिर येथे पर्यटकांवर दशहतवादी हल्ला पाकिस्तानचा निषेध करुन दशहतवाद्यांच्या हल्ल्यात मृत पावलेल्या डोबिंवली व भारतीय नागरीकांना श्रध्दांजली वाहुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली .

रिक्षा टॅक्सी चालकांचे दिवंगत लोकनेते संस्थापक अध्यक्ष स्व प्रकाश पेणकर नाना यांचे प्रतिमा पुजन करण्यात आले .

रिक्षा चालक मालक असोसिएशन कार्याध्यक्ष संतोष नवले यांनी संघटनेने रिक्षाचालकांच्या हिता करीता केलेल्या कामांची माहीती देऊन संघटनेचे व।संघटीत राहण्याच महत्व प्रस्तावनेत सांगीतले .

यावेळी अध्यक्ष प्रणव



पेणकर यांनी पदाधिकारी स्टॅण्ड प्रमुख उपस्टॅण्ड प्रमुख कार्यकर्ते यांच्याकडुन रिक्षाचालकांना भेडसावणार्या समस्या प्रश्न अडिअडचणी समजुन ऐकुन घेतल्या.

वाहतुक पोलिसांकडुन रिक्षाचालकांवर डिव्हाईस विना खाजगी मोबाईलवर वाहतुक नियमन कसुरी कारवाई अन्याकारक आहे नविन मोटार कायद्यानुसार वाढविलेले शुल्क व दंड रक्क्मेत कपात करावी रिक्षाचालकांचे प्रलंबित विविध प्रश्न समस्या अडीअडचणी सोडवण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा व प्रयत्न करु असे प्रतिपादन प्रणव पेणकर यांनी केले . माजी नगरसेवक रिक्षा चालक मालक असोसिएशन कल्याण पुर्व संघटक महेश गायकवाड कल्याण पुर्व उपाध्यक्ष हरी भालेराव भिवंडी तालुका रिक्षा चालक मालक असोसिएशन अध्यक्ष नारायण जाधव यांनी मेळाव्यात उपस्थित कार्यकर्ते रिक्षाचालकांना संबोधित केले .

रिक्षा चालकानी अनेक समस्या मांडल्या, अनेक वर्ष संघटना कामी योगदान देणार्या व उत्कूष्ट कामगिरी करणार्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला .

या प्रंसगी सुबल डे, जॉन कॅलिमिनो, काका मढवी, अब्दुल शेख गजानन पाटील, शगीर शेख, आबा भसमारे, नुर जमादार, विजय डफळ, सुभाष चव्हाण, प्रताप सरोदे बापु चतुर हेमंत ठाणगे, वसंत पाटील, मोहन म्हाञे, रवी पावशे, बंडु वाडेकर चंद्रशेखर नवले, रिझवान शेख, जगन्नाथ भागडे अजगर कुरेशी, श्रीरंग दातखिळे, चंद्रकात शिदें, विलास शेलार, समाधान पवार, गणीभाई शेख, यासीन शेख, नसीम खान, सत्तार शेख अस्लम घारे,चांद सैय्यद, वरुण दत्ता बंगाली, प्रकाश म्हाञे, सुरेश महाजन, प्रदीप टावरे संदीप मेहञे, आंबादास चौधरी, दत्तु भोईर, अविनाश पाटील, राधे चौव्हाण, मनोज जाधव, भारत धनगर इत्यादी पदाधिकारी कार्यकर्ते शेकडो रिक्षाचालक उपस्थित होते . कायैक्रमाचे सुत्रसंचालन संघटनेचे उपाध्यक्ष जीतु पवार यांनी केले.

## कोकणातील शाळांचे
# संचमान्यतेसाठी अटी शिथिल कराव्या - आ. ज्ञानेश्वर म्हात्रे

### रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षण समन्वय समितीच्या वतीने आंदोलनाचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप

**ठाणे : प्रतिनिधी** राज्यतील सर्व शाळांना दिनांक 15 मार्च 2024 च्या शासन निर्णयानुसार संच मान्यता मिळणार आहेत. दि.15 मार्च 2024 च्या शासन निर्णयामुळे कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड व पालघर हि जिल्हे डोंगरी, आदिवासी, सागरी भागात असल्यामुळे येथील किमान विद्यार्थी संख्येच्या बाबतीत फार मोठे आव्हान निर्माण झालेले आहेत. अनेक शाळांमध्ये 0 (शून्य) शिक्षक संख्या संचमान्यतेमध्ये आली आहे. त्यामुळे मराठी माध्यमाच्या शाळांना मोठा धोका निर्माण होत आहे. सदर शासन निर्णयातील अटी कोकणातील जिल्ह्यांसाठी शिथिल कराव्यात यासाठी समन्वय समितीची बैठक लावावी म्हणून कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

दि.15 मार्च 2024 चे शासन निर्णयातील अटी शिथिल व्हाव्यात म्हणून कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे सर यांनी शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांना यापूर्वी दोन वेळा पत्र देऊन बैठक लावण्याबाबत निवेदन दिले होते. तसेच मंत्री उदयजी सामंत, मंत्री नितेश राणे यांनीही कोकणातील शाळा व परिसर तसेच येथील समस्या शिक्षण मंत्री यांचे निदर्शनास आणून दिल्या आहेत. तरीही या संदर्भात गांभीर्याने विचार करून समन्वय समितीच्या सोबत बैठक लागावी म्हणून आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे सर यांनी शिक्षण मंत्र्यांना पुन्हा दिनांक 29 एप्रिल 2024 रोजी स्मरणपत्र दिले आहे व बैठक लावण्या संदर्भात पाठपुरावा सुरू आहे. बैठक न लावल्यास रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हा शिक्षण समन्वय समितीच्या वतीने जोरदार आंदोलन केले जाणार आहे. तरी सदर समस्याचे गंभीर्य लक्षात घेऊन तात्काळ दखल घ्यावी. शिक्षण विभागाचे सर्व अधिकारी व समन्वय समिती बरोबर येत्या आठवड्यात बैठक लावून समन्वय समितीच्या मागण्या बाबतीत विशेष चर्चा करून अटी शिथिल कराव्यात. तसेच सन 2024 - 25 या शैक्षणिक वर्षाची वाटप सुरू असलेली संच मान्यता तात्काळ स्थगित करण्याचे आदेश संबंधीताना द्यावे अशी मागणी निवेदनाद्वारे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी केली आहे.

# केडीएमसी आयुक्तांनी घेतला कल्याण पूर्वेतील नालेसफाई व कचरा व्यवस्थापनाचा आढावा

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त अभिनव गोयल यांनी कल्याण पूर्व "ड" प्रभागातील मोठे, मध्यम आणि लहान नाल्यांच्या स्वच्छतेसंदर्भात सविस्तर बैठक घेतली. या दरम्यान तेथील नालेसफाईचे काम अत्यंत असमाधानकारक असल्याचे निदर्शनास आले.

या कामात होत असलेल्या दिरंगाईवर आयुक्तांनी तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधित ठेकेदारास तात्काळ मनुष्यबळ वाढवण्याचे, यांत्रिकी पद्धतीने कामास गती देण्याचे तसेच कामाच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. तसेच, रस्त्यांवर साफसफाईनंतर अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचलेले असल्याने त्यांचे नियोजनबद्ध व्यवस्थापन करून त्वरित हटविण्याच्या सूचनाही दिल्या.

कामातील हलगर्जीपणाबद्दल आयुक्तांनी ठेकेदारास काळया यादीत टाकण्यात येईल असा इशारा दिला असून, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, वस्तू व सेवा कर कायदा, आपत्ती व्यवस्थापन कायदा व कामगार कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त अतुल पाटील यांनी कल्याण पश्चिम "क" प्रभाग कार्यालयात बैठक घेतली. त्यांनी१५ मे पूर्वी सर्व मोठे, मध्यम व लहान नाल्यांची सफाई पूर्ण करण्याचे निर्देश संबंधित अधिकारी व ठेकेदार यांना दिले. या बैठकीस उपआयुक्त अतुल पाटील, क चे सहा. आयुक्त धनंजय थोरात, ड चे सहा.आयुक्त उमेश यमगर, संबंधित ठेकेदार, मुख्य स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

महानगरपालिकेच्या वतीने येणाऱ्या पावसाळयापूर्वी संपूर्ण शहरातील नालेसफाईचे काम वेळेत, सक्षम व दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असून कोणतीही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असे आयुक्तांनी स्पष्टपणे सांगितले. त्याचप्रमाणे इतर प्रभागातही नालेसफाई आणि इतर बाबींचा प्रत्यक्ष आढावा घेतला जाईल अशी माहिती आयुक्त अभिनव गोयल यांनी यावेळी दिली.

# डोंबिवलीत दोन गटामध्ये जोरदार राडा
## परस्परविरोधी गुन्हे दाखल - चार जणांना अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली : पश्चिमेत दोन गटांमध्ये शनिवारी रात्री जोरदार राडा झाल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. केडीएमसीचे माजी नगरसेवक विकास म्हात्रे यांच्या समर्थक व मेघराज तुपांगे यांच्या गटात झालेल्या या वादात 3 ते 4 जण गंभीर जखमी झाले आहेत. विष्णूनगर पोलीस ठाण्यात दोन्ही गटांनी एकमेकांविरोधात परस्परविरोधी गुन्हे दाखल केले आहेत.**

या प्रकरणी विष्णुनगर पोलिसांनी अजय गोलतकर,शत्रुघ्न मढवी,विशाल म्हात्रे व अशोक म्हात्रे या चौघाना अटक करण्यात आली आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार मिलिंद देशमुख यांच्या कार्यालयात माजी नगरसेवक विकास म्हात्रे शनिवारी रात्री कामानिमित्त गेले होते. त्याच वेळी मेघराज तुपागे देखील तेथे आले. या ठिकाणी म्हात्रे यांचा पोलिस अंगरक्षक आणि तुपागे यांच्यात वाद झाल्यामुळे विकास म्हात्रे पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेले. मात्र त्याच दरम्यान राजूनगर येथील खंडोबा मंदिराजवळ दोन्ही गटांमध्ये हाणामारी झाली. या घटनेत दोन्ही बाजूंनी प्राणघातक हल्ल्याचे आरोप झाले आहेत. विकास म्हात्रे यांनी आरोप केला की, तुपागे गटाने त्यांच्या सहकाऱ्यांवर हल्ला केला असून त्यांना आणि त्यांच्या अंगरक्षकाला जिवे मारण्याचा प्रयत्न झाला. दुसरीकडे मेघराज तुपागे यांनी आरोप केला की, म्हात्रे यांच्या सांगण्यावरून त्यांच्यावर आणि त्यांच्या मित्रांवर तलवार, रॉड आणि लाकडी दांडक्यांनी हल्ला झाला. या झटापटीत त्यांची चैन चोरी गेल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. पोलिसांनी या प्रकरणी मेघराज तुपागे यांच्या तक्रारीवरून ओमकार म्हात्रे, प्रमोद चव्हाण, महेश चव्हाण, अजय गोलतकर आणि अखिल निंबाळकर यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. तर अजय गोलतकर यांच्या तक्रारीवरून मेघराज तुपागे, उमेश भोईर, शत्रुघ्न मढवी, विशाल म्हात्रे, अशोक म्हात्रे यांच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांनी काही जणांना ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.

# खेलो इंडियासाठी महाराष्ट्र गतका संघ बिहारमध्ये

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**कल्याण :** सातव्या खेलो इंडिया स्पर्धेकरिता बालेवाडी येथे क्रीडा युवक सेवा संचालनाने प्रशिक्षण शिबिर संपवून पुढील स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय सहसंचालक सुधीर मोरे, असोसिएशन ऑफ गतका महाराष्ट्र च्या उपाध्यक्ष अभिनेत्री अश्विनी महांगडे, सचिव प्रा.आरती चौधरी यांनी खेळाडूंना उत्कृष्ट प्रतीचा खेळ खेळून पदक प्राप्तीसाठी शुभेच्छा दिल्या. संघ 3 मे रोजी बिहारमध्ये दाखल झाला असून या स्पर्धा 5 मे ते 7 मे दरम्यान बिहार मधील गया या ठिकाणी होणार आहे.

या संघाचे प्रशिक्षक प्रा.आरती चौधरी (आंतरराष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक), मंथन पवार (राष्ट्रीय खेळाडू) तसेच संघ व्यवस्थापक आकाश थोरात क्रीडा अधिकारी हे काम पाहणार आहेत.

# स्केटींग स्पर्धेत स्केटलाईफला विजेतपद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** स्केटिंग असोसिएशन ऑफ कल्याण तालुका आणि स्पोर्ट्स केयर फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने रिजन्सी अन्टालिया शहाड येथे ७ वी कल्याण ट्रॉफी खुली स्केटींग स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत 'मिरा-भाईंदरच्या 'स्केटलाईफ स्पीड स्केटींग अकॅडमी'ने 155 गुण घेत स्पर्धेचे अंतिम विजेतपद मिळवले.

सर्व विजेत्या संघाना कल्याण ट्रॉफी आणि खेळाडुंना सुवर्ण, रौप्य आणि कास्य पदक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत मुंबई विभागामधून ३३० खेळाडुंनी सहभाग घेऊन स्पर्धेला मोठा प्रतिसाद दिला. स्पर्धा 'स्केटींग'च्या ५ विविध प्रकारात खेळवण्यात आली. या सर्व खेळाडूचा प्रशिक्षक संतोष मिश्रा यांचे मार्गदर्शन लाभले. स्पर्धेला पालकांनी मोठा प्रतिसाद दिला.



या स्पर्धेत पार्थी परमार, रोशन कोसांबिया, आकृती संजय झा, जियाना शेट्टी, सात्विका मूर्ती, त्विषा जव्हेरी, वेदांत शिंदे, रुद्रांश दास, मालविका बाईंग, मोहमद इब्राहिम, प्रशिव लोटके, ध्रुविका रावराणे, आरव सिंह, मार्विन डिसोझा, जियान प्रजापती, प्रिशा सिंह, ह्विद्या देशमुख, ओम हांडे, विवान गुप्ता, प्राक्षी चौधरी, ह्रदयम महींकार, आरुष अय्यर या खेळाडूंनी सुवर्ण पदक पटकावले.

तर श्रवंती, अलिश्बा शेख, रोनक कोसांबिया, शौर्य गोहिल, नीरव पाटील, रिशाल जैन, झारा फातिमा, स्वरांजली ससाणे, भव्य शाह, आलिया शेख, कबीर शेख, प्रियांश पठारे या खेळाडूंनी रौप्य पदक पटकावले.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com